**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २४ जुलै २०२५**

**ठळक बातम्या**

1. **भारत आणि ब्रिटनने मुक्त व्यापार करारावर केली स्वाक्षरी: द्विपक्षीय संबंधांमध्ये हा ऐतिहासिक दिवस असल्याचे पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन.**
2. **मुंबई उपनगरीय रेल्वे साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती.**
3. **सर्पमित्रांना ओळखपत्रासह १० लाखांचा अपघात विमा तसेच 'फ्रंटलाइन वर्कर'चा दर्जा देण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार.**
4. **गडचिरोलीत नवे कृषिभवन इमारत बांधकामास मान्यता कृषी मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांची माहिती.**

---

**मुक्त व्यापार करार**

**भारत आणि ब्रिटनन आज ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी केली. लंडनच्या चेकर्स येथे ब्रिटिश समकक्ष केयर स्टारमर यांच्याशी झालेल्या चर्चेनंतरच्या पत्रकार परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आज भारत-ब्रिटन द्विपक्षीय संबंधांमध्ये ऐतिहासिक दिवस आहे. अनेक वर्षांच्या कठोर परिश्रमानंतर दोन्ही देशांमधील व्यापक आर्थिक आणि व्यापार करार झाला आहे. याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. हा करार भारत आणि ब्रिटनच्या सामायिक समृद्धीचा मार्ग प्रशस्त करतो अस त्यांनी नमूद केल..........**

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी 43 सेकंद)***

***मुझे प्रसन्नता है कि कई वर्षों की मेहनत के बाद आज दोनों देशों के बीच कॉम्प्रीहेन्सिव इकोनॉमिक एंड ट्रेड एग्रीमेंट संपन्न हुआ है। एक और भारतीय टेक्सटाइल, फुटवियर, जेम्स एंड ज्वेलरी, सीफूड और इंजीनियरिंग गुड्स को UK में बेहतर मार्केट एक्सेस मिलेगा। भारत के एग्रीकल्चर प्रोड्यूस और प्रोसेस्ड फूड इंडस्ट्री के लिए UK की मार्केट में नए अवसर बनेंगे। भारत के युवाओं, किसानों, मछुआरों और एमएसएमई सेक्टर के लिए यह समझौता विशेष रूप से लाभकारी सिद्ध होगा।***

**ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांनी आपल्या निवेदनात म्हटले की, मुक्त व्यापार करार हा युरोपियन युनियनमधून बाहेर पडल्यानंतर ब्रिटनन केलेला सर्वात**

मोठा आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा व्यापार करार आहे. या करारामुळे दोन्ही देशांना मोठे फायदे होतील. ते म्हणाले की यामुळे वेतन वाढेल तसच राहणीमान उंचावेल.

-----------------------------------------

याचिका स्थगित

मुंबई उपनगरीय रेल्वेत २००६ मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी सर्व १२ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयानं दिलेल्या निर्णयाला आज सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, त्यावर आज न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती एन.के. सिंह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. राज्य सरकारच्या वतीनं महाअधिवक्ता तुषार मेहता यांनी न्यायालयात म्हणणं मांडलं. उच्च न्यायालयाच्या निकालातल्या काही निरीक्षणांमुळ मकोका अंतर्गत प्रलंबित असलेल्या इतर खटल्यांवर परिणाम होऊ शकतो, म्हणून या निर्णयाला स्थगिती द्यावी अशी विनंती त्यांनी केली. मात्र उच्च न्यायालयाच्या निकालानंतर तुरुंगातून सुटलेल्या आरोपींनी पुन्हा आत्मसमर्पण करावं अशी कोणतीही मागणी नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयानं मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती दिली. तसंच, या सर्व आरोपींना पुन्हा तुरुंगात ठेवण्याची आवश्यकता नाही असं स्पष्ट केलं.

-----------------------------------------

कामकाज तहकूब

विविध मुद्द्यांवरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळ लोकसभेचं कामकाज आज, आधी दुपारी २ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब झालं. लोकसभेच्या कामकाजाला प्रश्नोत्तराच्या तासान सुरुवात झाल्यानंतर विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणाबाजी सुरू केली. बिहारमधल्या मतदार याद्यांच्या पुनरिक्षणासह इतर विषयांवर चर्चा करण्याची मागणी करत काही विरोधक सभागृहाच्या हौद्यात उतरले. लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी सदस्यांना आपापल्या जागी जाऊन सभागृहाचं कामकाज सुरू करावं, असं आवाहन केलं. मात्र, विरोधकांचा गदारोळ सुरूच राहिल्यान बिर्ला यांनी सभागृहाचं कामकाज आधी दुपारी दोन वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

-----------------------------------------

शपथविधी

राज्यसभेत आज उपाध्यक्ष हरिवंश यांनी नवनियुक्त सदस्य उज्ज्वल निकम यांना शपथ दिली. निकम यांनी मराठीतून शपथ घेतली. आपला कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या सहा निवृत्त सदस्यांनाही सभागृहात निरोप देण्यात आला. बिहारमध्ये मतदार यादी पुनरिक्षण आणि देशभरातल्या सायबर फसवणुकीसह विविध मुद्द्यांशी संबंधित ३० स्थगन प्रस्ताव उपाध्यक्ष हरिवंश यांनी फेटाळून लावले आणि प्रश्नोत्तराचा तास पुकारला. परंतु विरोधी पक्ष सदस्यांनी त्यांच्या मुद्द्यावर घोषणाबाजी सुरू केली. त्यावर हरिवंश यांनी कामकाज सुरू ठेवण्याचे आवाहन करूनही गदारोळ चालूच राहिल्यान राज्यसभेचं कामकाज आधी दुपारी २,वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

---------------------------------------------

सर्पमित्र

ग्रामीण भागात वन्यजीव आणि मानवी संघर्ष कमी करण्यासाठी, विशेषतः सर्पांपासून होणारे धोके टाळण्यासाठी मोलाची कामगिरी बजावणाऱ्या सर्पमित्रांना आता लवकरच अधिकृत ओळखपत्र आणि १० लाख रुपयांचा अपघात विमा मिळणार आहे. त्यांना 'अत्यावश्यक सेवा' आणि 'फ्रंटलाइन वर्कर' म्हणून दर्जा देण्याबाबतही सकारात्मक विचार सुरू असून याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शिफारस करण्यात येईल. अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. मुंबईच्या मंत्रालय दालनातील बैठकीत त्यांनी सूचना केली. बैठकीला वनविभागाचे अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, राज्य वन्यजीव संरक्षक एम. श्रीनिवास राव, अखिल भारतीय सर्पमित्र आणि प्राणीमित्र संघटनेचे अध्यक्ष संभाजीराव पाटील उपस्थित होते.सर्व सर्पमित्रांची अधिकृत माहिती उपलब्ध होण्यासाठी एक विशेष पोर्टल तयार करण्यात येणार आहे. ही सर्व माहिती वनविभागाच्या पोर्टलवर उपलब्ध करून दिली जाईल, ज्यामुळे गरजूंना तात्काळ सर्पमित्रांशी संपर्क साधणे सोपे होईल आणि त्यांच्या कामात अधिक पारदर्शकता येईल. या निर्णयामुळे सर्पमित्रांच्या कार्याला प्रोत्साहन मिळेल आणि वन्यजीव संरक्षणात त्यांचा सहभाग अधिक वाढेल, अशी अपेक्षा अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी व्यक्त केली.

---------------------------------------------

कृषीभवन

गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतीविषयक गरजा अधिक प्रभावीपणे पूर्ण व्हाव्यात, कृषी विषयक सेवा एका छताखाली मिळाव्यात आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा या व्यापक हेतून गडचिरोलीत नवे कृषिभवन इमारत बांधकामास मान्यता देण्यात आल्याची माहिती कृषी मंत्री ॲड. माणिकराव

कोकाटे यांनी दिली. या प्रकल्पासाठी ११ पूर्णांक ६७ कोटींची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, हे भवन सोनापूर येथील फळ रोपवाटिकेच्या जागेत उभारले जाणार आहे. या निर्णयामागे शेतकऱ्यांना तातडीन, प्रभावी आणि आधुनिक सेवा मिळाव्यात हा मूळ उद्देश आहे. नव्यान होणाऱ्या या कार्यालयामध्ये जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, जिल्हा मृदा सर्व्हेक्षण आणि मृदा चाचणी प्रयोगशाळा तसच शेतकरी प्रशिक्षण गृह याचा या बांधकामामध्ये समावेश असणार आहे.

-----------------------------------------

क्रिकेट

आज मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड येथे अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी मालिकेतील चौथ्या कसोटी सामन्यात, जेव्हा शेवटचे वृत्त आले, तेव्हा भारताने इंग्लंडविरुद्ध 6 गडी बाद 321 धावा केल्या होत्या. आज खेळ पुन्हा सुरू झाला तेव्हा जडेजा 20 धावावर बाद झाला. सध्या रिषभ पंत 39 धावा आणि वॉशिंग्टन सुंदर 20 धावा वर नाबाद धावपट्टीवर खेळत आहेत. याआधी साई सुदर्शन ने 61 धावा, तर यशस्वी जयस्वाल ने 58 धावा केल्या. इंग्लंड कडून बेन स्टोक ने 3 गडी बाद केले.

-----------------------------------------

हवामान

हवामान! नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याने आज गोंदिया चंद्रपूर गडचिरोली येथे मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट घोषित केला असून उद्या 25 जुलै रोजी भंडारा गोंदिया आणि चंद्रपूर गडचिरोली येथे अति मुसळधार पावसाचा रेड अलर्ट तर नागपूर आणि वर्ध्याकरीता ऑरेंज अलर्ट घोषित केला असून सतर्कतेचा इशारा दिला आहे. गडचिरोली, जिल्ह्यात काल रात्री मुसळधार पाऊस पडल्याने नदी, नाले तुडुंब वाहत असून, तीन अंतर्गत मार्गांवरील वाहतूक ठप्प् झाली आहे. गोंदिया जिल्ह्यात रात्रीपासून सुरु असलेल्या पावसाने गोंदिया जिल्ह्यातील नदी नाल्यांसह धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. नदीची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी वैनगंगा नदीवर बनविण्यात आलेला धापेवाडा बॅरेजचे 7 दरवाजे सुरू करण्यात आला असून त्याच्यामधून 34 हजार क्युसेकने पाण्याच्या विसर्ग सुरू आहे. तर पुजारीटोला धरणाचे देखील 8 दरवाजे उघडण्यात आले आहेत. नदीकाठावरील गावातील नागरिकांना सतर्कतेच्या इशारा गोंदिया जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने देण्यात आला आहे.

-----------------------------------------

जनसंवाद

**राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे 26 जुलै शनिवार रोजी भंडारा जिल्हा दौऱ्यावर येणार असून, या दौऱ्यात महसूलमंत्री नागरिकांसोबत त्यांच्या विविध प्रश्न, समस्यावर जनसंवाद करतील. नियोजन सभागृहात 5 वाजता जनसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अस निवासी उपजिल्हाधिकारी लीना फलके यांनी कळवल आहे.**

**-----------------------------------------**